दिनांक - 31/12/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 154

विषय – विटा नगरपरिषदेस सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना व नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत विकास कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी उपअभियंता यांची दिनांक 31/12/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) मा.गोपीचंद पडळकर आमदार महाराष्ट्र विधानपरिषद यांचेकडील पत्र.

विटा नगरपरिषदेस सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना व नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत करणेत येणारी विकास कामे खालीलप्रमाणे.

1. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.5 (घुमटमाळ) येथे किरण चव्हाण घर ते विठ्ठल कदम घरापर्यंतचा रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.
2. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.11 डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर येथे भगवान बुध्द गार्डन परिसरात कॉंक्रिटीकरण करणे.
3. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.11 डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर येथे भगवान बुध्द हस्तमुद्रा ते स्टेज पर्यंतचा रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.
4. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.10 विवेकानंदनगर येथे शानबाग घर ते भिमराव चौगुले घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.
5. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.12 गांधीनगर राम कांबळे घर ते सागर जाधव घरापर्यंतचा रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.

तरी वरील कामे करणेकरिता सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे व सदर प्रस्ताव प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.जिल्हाधिकारीसो यांचे कार्यालयाकडे सादर करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 31/12/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 155

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील सि.स.नं. 1 मध्ये नगरपरिषद मालकीच्या जागेस गेट बसविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी उपअभियंता यांची दिनांक 31/12/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेच्या मालकीची नेहरुनगर येथील सि.स.नं. 1 मध्ये खुली जागा असून सदर ठिकाणी यापुर्वी संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेत आलेले आहे. सदर ठिकाणी बांधणेत आलेल्या संरक्षक भिंतीस अदयाप गेट बसविणेत आलेले नाही तरी सदर ठिकाणी गेट नसल्याने जागेचा गैरवापर होणेची शक्यता असलेने व सदर जागेचे सुरक्षिततेच्या दृष्टीने भिंतीस गेटचे बसविणे आवश्यक आहे. तरीविटा नगरपरिषद हद्दीतील सि.स.नं. 1 मध्ये नगरपरिषद मालकीच्या जागेस गेट बसविणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 31/12/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 156

विषय – विटा शहरातील भटक्या कुत्र्यांचे Dog Control Programme चे नियोजन करणे, व्यवस्थापन करणे, भटक्या कुत्र्यांना पकडणे, वाहतूक करणे, नसबंदी शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करणे व औषधोपचार करुन कुत्र्यांना सोडून देणे तसेच तद्अनुषंगिक कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी स्वच्छता निरिक्षक यांची दिनांक 31/12/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद क्षेत्रामध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या खूप वाढली असून शहरातील नागरिकांना व लहान मुलांना ही भटकी कुत्री चावनेचे प्रकार घडत आहेत. भटकी कुत्रे शहरामध्ये फिरत असल्याने रस्त्यावरील मार्गक्रमण करणारे लहान मुले, महिला, वृध्द नागरीक, विद्यार्थी, नागरीक यांचेवर हल्ला करीत आहेत. तसेच रहदारी करणा-या दुचाकी वाहन धारकांना अडथळा निर्माण होत असून वारंवार मोठ्या प्रमाणात वाहनांचे अपघात होत आहेत. भटक्या कुत्र्यांच्या विष्ठेमुळे दुर्गंधी पसरून ठिकठिकाणी अस्वच्छतादेखील होत आहे. त्याचा नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. अशा आशयाच्या नगरपरिषदेमध्ये नागरीकांच्या तक्रारी दाखल झालेल्या आहेत. भटक्या कुत्र्यांची संख्या कमी करावयाची असलेस The Animal Birth Control (Dogs) Rules 2001 मधिल 3 (3) अन्वये विटा शहरातील भटक्या कुत्र्यांचे Dog Control Programme चे नियोजन करणे, व्यवस्थापन करणे, भटक्या कुत्र्यांना पकडणे, वाहतूक करणे, नसबंदी शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करणे व औषधोपचार करून कुत्र्यांना सोडून देणे तसेच तद्अनुषंगिक कामे करणे आवश्यक आहे. जेणेकरून त्यांची शहरात उत्पत्ती वाढणार नाही व भटक्या कुत्र्यांची संख्या कमी होईल. सन 2023-24 या वर्षाची सदर कामाची मुदत दि.04/10/2024 रोजी संपलेली असून या कामाची निविदा प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

शहरातील भटक्या कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करणेसाठीची यंत्रणा पशुवैदयकिय विभाग विटा नगरपरिषदेकडे उपलब्ध नाही. त्यामुळे भटक्या कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करणेसाठी रितसर निविदा मागवून कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करणे आवश्यक असलेने सदरचे कामाची निविदा काढून भटक्या कुत्र्याची नसबंदी शस्त्रक्रिया करणेसाठी एजन्सी नियुक्त करणेस, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन आदेश क्रमांक एमसीजारे / 2020/प्रक्र 71/नवि- 14 दिनांक 24/12/2021 तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 316 (व) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सदरचे काम करणेस व यासाठी येणारा खर्च नगरपरिषद निधीतून करणे आवश्यक आहे.

पान नं.2 वर

तरी विटा शहातील भटक्या कुत्र्यांचे Dog Control Programme चे नियोजन करणे, व्यवस्थापन करणे, भटक्या कुत्र्यांना पकडणे, वाहतूक करणे, नसबंदी शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करणे व औषधोपचार करून कुत्र्यांना सोडून देणे तसेच तद्‌अनुषंगिक कामे करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 31/12/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 157

विषय – जिल्हा वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम -2024 राबविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 31/12/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील पत्र जा.क्र.नप्रसं/का-11/2024/राक्रीधो/6176, दि.04 ऑक्टोंबर 2024.

3) मा. जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचे पत्र क्र.नवि/राक्रीधो/कार्या-5/कावि-619/2024, दि.30/12/2024.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार, सांगली जिल्ह्यातील नगरपरिषद/नगरपंचायत यांच्या जिल्हा वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा दि.11/01/2025 ते 13/01/2025 दरम्यान आयोजित करण्यात येणार आहेत. सदर स्पर्धापैकी क्रिडा स्पर्धा या दि.11/01/2025 व 12/01/2025 रोजी विटा येथे आयोजित करण्यात आल्या आहेत.

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार सदर स्पर्धाच्या अनुषंगाने विटा नगरपरिषदेकडे खालील जबाबदारी देण्यात आली आहे.

1) स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे नियोजन करणे. (यामध्ये कार्यक्रमासाठीचे स्टेज, मंडप, स्पीकर व्यवस्था)

2) सर्व क्रीडा प्रकारांच्या क्रीडांगणांचे (वैयक्तिक /सांधिक) व पंच / परीक्षक यांचे नियोजन करणे.

3) दि.11 व 12 जानेवारी रोजी उपस्थित सर्व स्पर्धक, उपस्थित नगरपरिषद/नगरपंचायत अधिकारी व कर्मचारी इ. ची अल्पोपहार व भोजनाची व्यवस्था करणे.

तरी जिल्हा वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम -2024 राबविणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा